बातम्या, लेख व जाहिरातीसाठी
लातूर समाचार
समर्थनगर
धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १८२ वा | शनिवार दिनांक २७ सप्टेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकरभोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### दारुच्या बाटल्या फोडून केले नुकसान:गुन्हा दाखल

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, शेखर बलभिम मंडले,वय २१ वर्षे, विकास प्रभाकर जमादार, वय १८ वर्षे, शिवाजी धोंडीप्पा जमादार, वय २४ वर्षे, अमोल व्यंकट जमादार, वय २० वर्षे, राजु लक्ष्मण दासे, वय २० वर्षे, रोहीत दत्तत्रय दासे, वय २५ वर्षे, सर्व रा.कंटेकुर ता. उमरगा जि. धाराशिव यांनी दि.२४.०९.२०२५ रोजी मुरुम ते मुरुम मोड जाणारे रोडचे कडेला रवि बिअर बार मुरुम मध्ये तोंडाला कपडा बांधून हातामध्ये कुहाड, हंटर व लोखंडी रॉड घेवून बिअर बार मध्ये येवून बार मधील फिर्याद नामे- संतोषकुमार जनार्धन बंडी, वय ४५ वर्षे, व्य बार मॅनेजर रा. सिध्दपेठ ता.जि. तेलंगणा ह.मु. रवि बार मुरुम ता. उमरगा जि. धाराशिव व वेटर विनय श्रीनिवास पुरुषोत्तम मारहाण करुन बारमधील विविध कंपनीच्या दारुच्या बाटल्या फोडून अंदाजे १२,७८० चे नुकसान केले. तसेच काउंटर मधील आठ ते दहा हजार चोरुन घेवून दरोडा घातला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- संतोषकुमार जनार्धन बंडी यांनी दि.२५.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन मुरुम पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३१० (२),३११, ११८(१), ३२४(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

### प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत ॲपे रिक्षा क्र एमएच २५ ई ९७६६ चा चालक यांनी दि.२४.०९.२०२५ रोजी मुरुम ते मुरुममोड जाणारे रोडवर ॲपे रिक्षा क्र एमएच २५ ई ९७६६ मध्ये गोवंशीय जातीचे २ वासरे वाहनासह एकुण २५,००० किंमतीचे गोवंशीय जातीचे वासरे त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करताना मुरुम पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१) (ए) (एच) सह प्राणी संरक्षण अधिनियम ५(अ), ५(ब), ९ सह मपोका कलम ११९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## पडझड झालेल्या शाळांची पाहणी करून दुरुस्तीचे प्रस्ताव सादर करा

### आमदार राणाजगजितसिंह पाटील यांचे जिल्हा परिषदेच्या सीईओंना पत्र



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील विविध भागांतील शाळांची पडझड झाली आहे. काही ठिकाणी शाळेच्या इमारती पूर्णपणे क्षतिग्रस्त झाल्या आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो. अशा शाळांची तातडीने पाहणी करून दुरुस्तीचे आहवाल सादर करावेत, असे निर्देश मित्रचे उपाध्यक्ष, आमदार राणाजगजतिसिंह पाटील यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिले आहेत.

सततच्या मुसळधार पावसामुळे शेती, पिके घरांचेही नुकसान झाले आहे. महाळंगी (ता. धाराशिव) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला गळती लागल्याचे शुक्रवारी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या निदर्शनास आले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी तेथूनच मोबाईलवरून संपर्क साधून त्यांनी शाळेची दुरुस्ती करून घेण्याची सूचना केली.

अस्मानी संकटामुळे होत्याचे नव्हते झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला आहे. शेतीच्या नुकसानीसह ग्रामीण भागातील जनजीवनही विस्कळीत झाले आहे. अनेक गावांतील शाळांनाही त्याचा फटका बसला आहे. इमारतींना तडे गेले आहेत. अनेक ठिकाणी गळती लागली आहे. निरागस चिमुकल्या मुलांना धोकादायक परिस्थितीत शिक्षण घ्यावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी महाळंगी गावातील शाळेला आवर्जून भेट दिली. चिमुकल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांनी अडचणी जाणून घेतल्या. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना जिल्ह्यातील सर्व शाळांची सध्या काय अवस्था आहे, याचा वस्तुनिष्ठ अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश मोबाईलवर संपर्क साधून दिले. नंतर त्यांनी पत्रही दिले. शेत-शिवाराची काळजी घेत असतानाच या चिमुकल्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी आपलीच आहे, या भावनेतून आमदार पाटील यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याशी संपर्क साधून जिल्हा परिषदेच्या शाळांच्या दुरुस्तीबाबत चर्चा केली.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, त्यांची सुरक्षितता सुनिश्चित व्हावी, शाळांची दुरुस्ती, पुनर्बांधणीचे प्रस्ताव तातडीने सादर करावेत, असेही आमदार पाटील यांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे. महाळंगी येथे शाळेची पाहणी करताना जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष नेताजी पाटील, बाजार समितीचे चेअरमन राजाभाऊ पाटील, माजी चेअरमन व्यंकट पाटील यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते, शाळेतील शिक्षक आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## परंडा-भूम तालुक्यातील ३०० पूरग्रस्तांची यशस्वी सुटका : खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर



धाराशिव (प्रतिनिधी)- परंडा व भूम तालुक्यातील महापुराने गावोगाव भीषण परिस्थिती निर्माण केली होती. मुसळधार पावसामुळे नदी-नाल्यांना आलेल्या पुराच्या पाण्याने शेकडो घरं जलमय झाली. अनेकांना घरदार सोडून सुरक्षिततेसाठी धाव घ्यावी लागली, तर शेकडो नागरिक पाण्याच्या कवेत अडकून पडले होते. या भीषण परिस्थितीत खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर हे छऊठऋ, आर्मी व जिल्हा प्रशासनासह दोन दिवस अखंड प्रयत्न करत सुमारे ३०० नागरिकांची सुटका करण्यात यशस्वी ठरले. या बचाव कार्य मदत करत व स्वतः मैदानात उतरत खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी अनेक माता-भगिनी वृद्ध व व नागरिकांना पुराच्या पाण्यातून सुखरूप व सुरक्षित स्थळी पोहोचवले. यानंतर प्रतिक्रिया देताना त्यांनी संकट समयी मदत करणे हे माझे कर्तव्यच होते या ठिकाणी माझे कुटुंबीय समजून मी सर्व लोकांना सुखरूप बाहेर काढले असे म्हटले आहे.

या मोहिमेत लाखी (१२), कपिलापुरी (९), वडनेर (४), देवगाव (२६), वाघेगव्हाण (१७३), कारंजा (२), इट (१), ढगपिंपरी (८), रुई (१३), नालगाव (१९), तांबेवाडी (६), मुंगशी (१२), उळूप (६), जांब (१), रामेश्वर (१), ईडा (७) या गावांतील नागरिकांची सुटका करण्यात आली.

जिल्हा प्रशासनाचा तातडीचा प्रतिसाद आणि जवानांचे धाडस यामुळे शेकडो नागरिकांचे प्राण वाचले. या शौर्यपूर्ण कार्यामुळे पुरग्रस्त भागात दिलासा आणि सुरक्षिततेची भावना पसरली आहे.

यावेळी खासदार ओम प्रकाश राज निंबाळकर यांनी एनडीआरएफ व मदत कार्यातील सैनिकांचे मनापासून आभार व्यक्त केले

## उपकेंद्र आळणीत ३७६ रूग्णाची तपासणी



धाराशिव (प्रतिनिधी)- दि:- २५ प्रा. आ. केंद्र येडशी उपकेंद्र आळणी गावात स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान आरोग्य शिबीर मा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ सतिश हरिदास माता बालसंगोपन अधिकारी डॉ कुलदीप मिटकरी तालुका आरोग्य अधिकारी डॉ प्रमोद गिरी यांच्या आदेशानुसार आरोग्य शिबीर आळणी गावात घेण्यात आले सदर शिबीराचे उदघाटन सरपंच श्री प्रमोद वीर,पोलीस श्री पाटील प्रमोद माळी, तंटामुक्ती अध्यक्ष श्री श्याम बापू लावंड, ग्रा. प सदस्य अक्षय श्री कदम,श्री अनंत खोबरे, श्री संतोष चौगुले, यांच्या शुभ हस्ते शिबीराचे उदघाटन करण्यात आले या शिबीरात एकूण ३७६ रूग्णाची विविध आजाराची व रोगाची आरोग्य तपासणी तज्ञ डॉ अश्विनी बलवंडे (स्त्री रोग तज्ञ) डॉ अंजिक्य वढगणे (हृदय रोग तज्ञ) डॉ आकाश भाकरे ( अस्थिरोग तज्ञ) डॉ अमृता भाकरे ( बालरोग तज्ञ) डॉ वृशाली मस्के (दंतरोग तज्ञ) डॉ शिवरूपी इसाके (नेत्र रोग तज्ञ) वैद्यकीय अधिकारी डॉ स्नेहा शिंदे डॉ प्रणिता क्षिरसागर डॉ अमिना शेख डॉ विलास तोडकर डॉ बालाजी शिंदे डॉ मोटे रेणुका ब्लड बॅक डॉ संजय शिंदे डॉ बारकुल मॅडम व मानसोपचार तज्ञ यांच्या बीपी, शुगर, रक्तची तपासणी हृदयाची, तपासणी ईसीजी डोळे, नाक, कान, घसा, द-ीरू सी बी सी एच बी, बालकांची तपासणी गरोदर माताची तपासणी, त्वचाची तपासणी , लसीकरण,गर्भाशय तपासणी, कुष्ठरोग रोग तपासणी मानसोपचार रूग्ण तपासणी, करण्यात आली व रक्त दान अवयव दान पण करण्यात आले तसेच ई की वाय सी, आयुष्यामान कार्ड,हि काढण्यात आले तसेच शालेय पोषण आहार बदल समदोशन, हि अंगणवाडी ताई यांच्या माध्यमातून देण्यात आले तसेच या वेळी सदर शिबीर यशस्वी श्री सुरेश गंगावणे आरोग्य सहाय्यक श्री एस पी कदम आरोग्य सहाय्यक श्री प्रशांत शिंदे आरोग्य सेवक श्री युवराज चौगुले आरोग्य सेवक श्री राहुल पतंगे श्रीमती सावंत आरोग्य सेविका भारती पौळ सुपरवायझर प्रमिला पवार आशा ताई कालिंदा कदम नंदा कदम शोभा गायकवाड यांनी सहकार्य केले आहे तसेच प्रा आ केंद्र येडशी उपकेंद्र उपळा, शिंगोली, जवळे दु, कुमाळवाडी, अंतर्गत शिं तांडा, जा. वाडी तांडा, जाहगीदारवाडी, गड, या गावात स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान शिबीर घेण्यात आले आहे तसेच दि. २९/९/२०२५ रोजी येडशी येथे शिबीर आयोजित करण्यात आले आहे तरी या शिबीरात विविध आजाराची व रोगाचे तपासणी तज्ञ डॉक्टर कडून घेण्यात येणार आहे तरी जास्ती जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन आरोग्य सहाय्यक सुरेश गंगावणे यांनी केले आहे

## विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत युवा व क्रीडा संवाद कार्यक्रम

धाराशिव,दि.२६ सप्टेंबर (जिमाका) विकसित महाराष्ट्र २०४७ या उपक्रमाअंतर्गत लातूर विभागस्तरीय युवा व क्रीडा संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान क्रीडा व युवक कल्याण विभागाचे मंत्री भूषविणार आहेत.

या संवादामध्ये लातूर विभागातील धाराशिव,लातूर व नांदेड जिल्ह्यांतील आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीयस्तरावर यश संपादन केलेले खेळाडू,शिवछत्रपती व राष्ट्रीय-राज्य पुरस्कारार्थी, प्रशिक्षक, क्रीडा शिक्षक, पालक, संघटनांचे प्रतिनिधी,क्रीडा पत्रकार तसेच क्रीडा क्षेत्रातील तज्ञ सहभागी होणार आहेत.

मुख्य कार्यक्रमाआधी खेळाडूंना स्वतंत्र गटांमध्ये विभागून त्यांच्या अडचणी,क्रीडा सुविधांबाबतच्या मागण्या व शासनाकडून असलेल्या अपेक्षा यावर चर्चा करून मुद्दे तयार केले जातील.या मुद्द्यांचे मांडणी प्रत्येक गटातील प्रतिनिधींकडून थेट मंत्री महोदयांसमोर केली जाणार आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रीडा आयुक्त/ सहसंचालक प्रस्ताविक करतील,तर समारोप प्रसंगी मंत्री महोदय मार्गदर्शन करतील. तसेच उपस्थित मान्यवर व सहभागींसाठी विभागामार्फत अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली असून, शेवटी क्रीडा उपसंचालक आभारप्रदर्शन करणार आहेत.

या उपक्रमासाठी धाराशिव जिल्ह्यातील सर्व खेळाडू,प्रशिक्षक, क्रीडा शिक्षक,संघटनांचे प्रतिनिधी व क्रीडाप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा,असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीकांत हरनाळे यांनी केले आहे. इच्छुकांनी आपली उपस्थिती दिनांक ९ ऑक्टोबर २०२५ पर्यंत ई-मेल (distsports. osmanbadgmail.com), व्हॉट्सॲप ( ८८३०३७४८०५) किंवा श्री तुळजाभवानी जिल्हा स्टेडियम, धाराशिव येथे कार्यालयीन वेळेत कळवावी.

## धनगर समाजाचे धरणे आंदोलन




धाराशिव (प्रतिनिधी)- दि.२६ रोजी सकल धनगर समाजाच्या वतीने जालना येथे चालू असलेल्या संघर्ष योद्धा दिपक भाऊ बोऱ्हाडे यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी तसेच त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी शेकडो धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांनी एक दिवसीय धरणे आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालय धाराशिव यांच्यासमोर केले. तसेच सकल मराठा समाजाच्या वतीने उपोषण करते दीपक भाऊ बोऱ्हाडे यांच्या उपोषणाला जाहीर पाठिंबा देण्यात आला. जिल्हा विधीज्ञ मंडळ धाराशिव यांच्या वतीने सकल धनगर समाज आंदोलनाला जाहीर पाठिंबा देण्यात आला. आंदोलनाची दखल घेऊन नायब तहसीलदार खोत यांनी आंदोलन स्थळी येऊन निवेदन स्वीकारले व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांच्याकडे आम्ही आपल्या मागण्या पाठवून सकारात्मक चर्चा घडवू असे आश्वासन दिले. यावेळी धाराशिव जिल्ह्यातील सकल धनगर समाज खूप मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## शारदीय नवरात्र सांस्कृतिक महोत्सवात फोक लोक स्टुडिओची लोकसंगीत-लोकनाट्य मैफल; तुळजाभवानी गाण्यांच्या अल्बमचे प्रकाशन



श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान आयोजित शारदीय नवरात्र सांस्कृतिक महोत्सवामध्ये गुरुवारी फोक लोक स्टुडिओच्या कलाकारांनी लोकसंगीत आणि लोकनाट्य यांचा सुंदर मिलाफ घडवून रसिकांना एक अनोखा अनुभव दिला.महाराष्ट्राच्या वैभवशाली परंपरेतील जुन्या पारंपरिक रचना तसेच नवीन स्वरचित कलाकृतींमधून त्यांनी अर्थपूर्ण आणि नाट्यमय सादरीकरण सादर केले. परंपरा ही फक्त मागे वळून पाहण्याची नव्हे तर नवीन पिढीच्या नजरेतून अनुभवण्याची गोष्ट आहे,याची प्रचिती देणारा हा कार्यक्रम ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार आणि पोलिस अधीक्षक रितू खोकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली.

स्त्रीशक्तीचा गौरव - प्रियंका पासले यांचा सन्मान

शारदीय नवरात्र सांस्कृतिक महोत्सवामध्ये दररोज एका महिलेला सन्मानित करण्यात येत आहे. त्यानुसार गुरुवारी २५ सप्टेंबर रोजी प्रियंका रघुवीर पासले यांना श्री तुळजाभवानी देवींजींची प्रतिमा, कवड्याची माळ,महावस्त्र आणि ११ हजार रुपयांचा धनादेश देऊन सन्मानित करण्यात आले.

विविध उपजीविका उपक्रम राबवून स्थानिक महिलांना रोजगार व स्वावलंबी करण्यासाठी त्यांचे उल्लेखनीय कार्य आहे.याची दखल घेत मंदिर संस्थानच्या वतीने जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार व सौ.सौमय्याश्री पुजार यांनी त्यांचा यथोचित गौरव केला.

या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,सहायक जिल्हाधिकारी तथा भूमचे उपविभागीय अधिकारी रेवैय्या डोंगरे,निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव,उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख,तहसीलदार तथा विश्वस्त अरविंद बोळंगे,तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने,नगर परिषदेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे,पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपिन शिंदे तसेच मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

**तुळजाभवानी देवींच्या गाण्यांच्या अल्बमचे प्रकाशन**

तुळजाभवानी देवीला अर्पण करण्यात आलेल्या तीन गीतांच्या एका विशेष अल्बमचे प्रकाशन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या उपस्थितीत करण्यात आले. त्यातील 'तुळजाभवानी' हे शीर्षक गीत सुप्रसिद्ध गायक आदर्श शिंदे यांनी गायले आहे.तर 'तुळजाभवानी मंत्र - सर्व मंगल मांगल्ये' हे गायिका संचारी सेनगुप्ता यांनी गायले आहे. तसेच, 'तुळजाभवानी मंत्र,गोंधळ, स्तुती' हे गीत आदर्श शिंदे,संचारी सेनगुप्ता आणि गौरव चाटी यांनी गायले आहे. या तिन्ही गाण्यांना संगीतकार गौरव चाटी यांनी संगीतबद्ध केले असून गीतकार विक्रांत हिरनाईक यांनी शब्दबद्ध केले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥

# लातूर समाचार

## शेतकऱ्यावरील संकट दूर करावे लागेल

महाराष्ट्रातील शेतकऱ्यावर पावसाने म्हणजे निसर्गाने मोठे संकट निर्माण केले आहे. अशा स्थितीत ते दूर करण्यास प्रथम प्राधान्य दिले पाहिजे. राज्याल सर्व आर्थिक उलाढाल ही शेतीवर अवलंबुन आहे. बाजारात जी खरेदीची गर्दी दिसते ते शेतकऱ्यांच्या कुटुंबियाची दिसते. जरा विचार केला तर ज्यावर्षी मोठ्या प्रमाणात शेतीचे पीक हाती लागते त्यावेळी बाजारात खरेदीसाठी गर्दी दिसून येते. व्यापारी सुद्धा म्हणतात यावर्षी सोयाबिन चांगले झाले. म्हणूनच आमच्या दुकानात गर्दी दिसून येते. शेतकऱ्याकडे पैसा असेल तर तो जमा ठेवत नाही तो पैसा बाजारात फिरवितो. अनेक वस्तू खरेदी करतो. कपडे खरेदी करतो. त्याच प्रमाणे घराची दुरूस्ती करतो. यासाठी घरावर पत्रे असोत किंवा घरावर बांधणी असो विविध प्रकारे तो पैसा बाजारता खर्च करीत असतो. तसे पगार, नौकरदाराच्या हातून होत नाही. तो बँकेत जमा करतो. त्यांची बाजारात खर्च करण्याची मानसिकता दिसून येत नाही. खर्च करणारा हा शेतकरी आहे. तो बाजार चालवितो. एवढेच काय आज जी मोठ्या प्रमाणात साखर कारखानदारी उभा आहे ती कोणामुळे, तर शेतकऱ्यामुळे उभी आहेत. तो ऊस पुरवितो. वर्षभर पोसलेला ऊस कारखान्याला देत असल्याने कारखाने चालतात. बाजारात शेतात पिक पिकतो म्हणून सर्वजन खातात. जर शेतात शेतकऱ्यांनी ज्वारी, गव्हू आदि पिकविलेच नाही तर काय खाणार? भारताला कृषी प्रधान देश म्हणून ओळखतात. शेतकऱ्यामुळे सर्व भारतीय सुखी आहोत हे विसरून चालणार नाही. म्हणून शेतकऱ्यास पोशिंदा म्हणतात. याचा अर्थ तो पोसतो आहे, खाऊ घालतो आहे. याचा विचार सध्याला कोणी करीत नाही. शेतकऱ्यावर सर्वांचा डल्ला आहे. कोणतेही अनुदान आले तर बँका कर्ज खात्यात जमा करीत असल्याची तक्रार पुढे आली आहे. नुकसान भरपाई आली तर बँका जमा करणार का? तसे केले तर झालेल्या नुकसान कसे भरून काढणार? मुळात सर्व नियम हे शेतकऱ्यावर बसविले जातात. इतरांवर नाही. आज विचार केला तर राज्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. काही केले तरी त्याला या संकटातून बाहेर काढले पाहिजे. त्यासाठी भरीव तरतुद व मदतीची गरज आहे. आज जर वेगळा विचार करून शेतकऱ्याला या पाणी संकटातून बाहेर काढले नाही तर आगामी काळात मोठे संकट उभा राहिल. बाजार मोडकळीस येईल. बाजार समित्या बंद पडतील. साखर कारखाने बंद पडल्यास शेकडोंच्या संख्येने कामगार बेरोजगार होतील. त्यामुळे काही झाले तरी मोठ्या प्रमाणात मदतीची गरज आहे. पंचनामे वगैर ही जुनी पद्धत आहे. आता नुकसान किती झाले. कोणत्या भागात झाले. कशाचे झाले. कशाप्रकारे झाले हे प्रगत यंत्रणेद्वारे कळते. त्यासाठी विलंब हा विषयच आता उरला नाही. केवळ मदत देण्याची मानसिकतेची गरज आहे. आज देशात विविध राज्यात पावसाने संकट निर्माण केले आहे. पंजाब शेतकऱ्यास मोठ्या प्रमाणात मदत दिली जाते मग महाराष्ट्रातील शेतकऱ्यास कमी का? हा विषय विरोधकांनी लावुन धरला पाहिजे. विरोधकांनी आता आळस बाजूला सरून आडचणीत आडकलेल्या शेतकऱ्यास मदत केली पाहिजे. शेतकरी एकदा का कोलमोडला तर राज्यातील आर्थिक स्थिती बिघडणार आहे. ती पुन्हा रुळावर येणे आवघड होणार आहे. त्यामुळे जेवढ्या तातडीने मदतीची गरज आहे. राज्यात पाऊस काही थांबण्याचा विचार करीत नाही. दररोज पाऊस होत आहे. नदी-नाले, धरणे पुर्ण क्षमतेने भरली आहेत. त्यामुळे पाणी मोठ्या प्रमाणात जमीनीत मुरले आहे. आता निचरा होणे आवघड आहे. कडक उन्हाची गरज आहे. निसर्ग हा मानवाच्या ईशारावर चालत नाही. हे लक्षात घेऊन कधी नाही एवढे संकट निसर्गाने निर्माण केले आहे. त्यावर मात केली पाहिजे. यासाठी राज्यातील शेतकऱ्याकडे मोठे बँक बॅलेंस नाही. बँकेत अनुदान जमा होताच बँका समोर रांगा लागतात. ही वस्तूस्थिती सर्वांना माहिती आहे. त्यामुळे शेतकरी हा कसा आहे. तो काही आर्थिकदृष्ट्या संपन्न नाही. ही बाब पहिल्यांदा लक्षात घेतली पाहिजे. ईतर प्रांतात शेतकरी सुखी व संपन्न आहे. कारण पंजाब मध्ये सध्याला संकट आले आहे मात्र नद्यामुळे पाण्याची बाराही महीणे उपलब्धता आहे. त्यासाठी महाराष्ट्र सोडले तर शेतकरीच्या आर्थिक आवस्था चांगली आहे. महाराष्ट्रात सतत शेतकरी आर्थिक संकटात सापडला जात आहे. साखर कारखाने हे काही एकदम रक्कम देत नाहीत, ते हप्ते पाडून देतात. ऊस एका दमात घेऊन जातात तर पहिला हप्ता, दुसरा हप्ता अशा विविध हप्तानुसार वाटप होते. तरी शेतकरी तक्रार करीत नाहीत. कधी वेतन आगामानुसार पाचवे, साहावे वेतन मिळावे म्हणून रस्त्यावर येत नाहीत. कधी आंदोलने करीत नाही. नेत्याचे प्रतिकात्मक पुतळे जाळत नाहीत. मुकाट्याने संकट पेलावत असतात, तरी त्याकडे दुर्लक्ष होताना दिसून येते. आता संकट मोठे आहे. मदतीशिवाय शक्य नाही. ही वस्तूस्थिती आहे. लागलीच शेतीत सुधारणा होणार नाही. पावसाच्यापाण्यामुळे जमीन नापिक होते. कस कमी होतो. जमीनीतील माती वाहून गेली आहे. परत टाकणे अशक्य आहे. माती आणायाची कोठून, कस पुन्हा कसा निर्माण करावयाचा हा मोठा प्रश्न आहे. त्यामुळे सर्वबाजूने शेतकरी आर्थिक आडचणीत सापडला आहे. त्यासाठी भरीत मदतीची गरज आहे. काही झाले तरी ती मदत लवकरात लवकर देणे अपेक्षित आहे. तरच ते दसरा व दिवाळी सारखा मोठा सण आनंदाने साजरा करू शकतात. सरकारची जी देण्याची प्रक्रिया असते ती कासवाच्या गतीची असते. दमाने काम करण्याची वृत्ती असते. त्यात सरकारकडून थेट खात्यात रकमा जमा होतात ही एक चांगली पद्धत आहे, त्याचाच उपयोग करून घेऊन मोठ्यात मोठी रक्कम खात्यात जमा करणे आवश्यक आहे. शेतकरी पुर्ण आर्थिकदृष्ट्या कोलमोडला आहे. पुन्हा उभारी घेईल परंतु याला वेळ लागणार आहे. त्यासाठी सरकारने शक्य तितक्या लवकर नुकसान भरपाई दिली पाहिजे. याला प्राधान्यक्रम दिला पाहिजे. तरच राज्यात सर्वजन सुखी, समाधानी दिसून येतील. शेतकऱ्याशिवाय बाजार फुलला जात नाही हे सत्य आहे.

# बँकेच्या नवीन तंत्रज्ञानाबाबत खातेदारांनी अधिक सतर्कता बाळगणे गरजेचे- सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील

**नळेगाव/प्रतिनिधी :** बँकेच्या नवीन तंत्रज्ञानाबाबत खातेदारांनी आता अधिक सतर्कता बाळगणे गरजेचे असून, सायबर क्राईम पासून आपण सर्वांनी सावध राहिली पाहिजे असे प्रतिपादन राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी नळेगाव येथे केले.

ते नळेगाव येथे महेश बँक अहमदपूरच्या ३२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत उद्घाटक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी राज्यमंत्री बाळासाहेब जाधव उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर चाकूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष करीमसाहेबजी गुळवे, माजी उपाध्यक्ष माणिकराव पाटील, माजी उपसभापती पद्माकरराव पाटील, माधवराव पाटील, उपसभापती संजय पवार, सरपंच सूर्यकांतराव चव्हाण, तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, संचालक शिवानंद तात्या हेंगणे, बालाजी दादा सूर्यवंशी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे यशवंतराव जाधव, मिलिंदराव महालिंगे दयानंदराव सुरवसे महेश बँकेचे उपाध्यक्ष निवृत्ती राव कांबळे अनिलराव वाडकर संचालक, संचालक नवनिहालसिंग जहागीरदार, मा. जिल्हा परिषद सदस्य सुदर्शन मुंडे तुकाराम पारवे, चेअरमन शेषेराव मुंजाने, संतोष गंभीरे, ॲड. भारतभूषण क्षीरसागर, राहुल सुरवसे, आशिष गुणाले, मुजिब पटेल जहागीरदार, तुकाराम पाटील, दिलीपराव जाधव, गणपत आबा कवठे, ॲड. विनायकराव भोसले, सतीश कल्याणी, अशोकराव गादेवार, पुरुषोत्तमजी पुरोहित, ॲड. सादिक शेख, नगरसेवक भागवत भैया फुले, नगरसेवक रामभाऊ कसबे, नगरसेवक नरसिंग भाऊ गोलावर, नगरसेवक शिवदर्शन स्वामी, जिल्हा उपाध्यक्ष गंगाधर आप्पा अवकानरू, संदीप शेटे, सावता माळी, सतीश राव नवटक्के, शिवशंकर हाळे, नामदेवराव शिंगडे, पप्पू सावंत, गणेश शिंदाडकर, खुदबोद्दीन घोरवाडे, श्याम मुंजाने, मोहनराव कुलकर्णी, दिलदार शेख, हनुमंतराव लवटे पाटील, बडे सर जहागीरदार, मार्शल माने, व्यंकटराव शिंदे, संजय पेन्सलवार, विश्र्वनाथ येडके, सिद्राम रंदाळे, प्रशांत मांडवकर तसेच बँकेचे सर्व सभासद, सरपंच, चेअरमन, संचालक मंडळ, सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की महेश बँकेने ग्राहकांच्या विश्र्वास संपादन केला विविध रूपाने कर्ज देऊन ग्राहकांना स्वतःच्या पायावर उभा करण्यासाठी प्रयत्न केले.

आपल्या सर्वांच्या आशीर्वादामुळे मला सहकार मंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. सहकार चळवळीला त्यामध्ये मी अधिक गती देणार असून, शेतकऱ्यांच्या मालाला भाव अधिक मिळाला पाहिजे यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. साखर कारखान्यांनी खर्चावर नियंत्रण ठेवलं पाहिजे असेही नामदार पाटील म्हणाले.

त्याच बरोबर आपण पाश्र्चिमात्य संस्कृतींना चालना न देता स्वदेशी वस्तूंचा वापर केला पाहिजे. खाद्यपदार्थांमध्ये पाश्र्चिमात्य संस्कृतीचे लोन मोठ्या



प्रमाणात आले आहे आपण ते न येऊ देता आपल्या स्वदेशी वस्तूंना प्राधान्य दिलं पाहिजे. त्याचबरोबर मी मतदार संघाला पाणीदार केल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही. चाकूर तालुक्यात अनेक विकासाचे प्रकल्प मार्गी लागणार असून चाकूरच्या ट्रामा कैअर सेंटरला आपण लवकरच निधी देणार आहोत. असेही ना. बाबासाहेब पाटील म्हणाले.

सर्वसाधारण सभेची प्रास्ताविक लातूरचे शाखा व्यवस्थापक सिद्राम रंदाळे यांनी केले तर अहवाल वाचन महेश बँकेचे उपाध्यक्ष निवृत्ती कांबळे यांनी केले. यावेळी नळेगावचे नेते माणिकराव पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दयानंद चोपणे तर आभार बँकेचे संचालक शिवानंद हेंगणे यांनी मानले.

या वार्षिक सर्वसाधारण सभेस अहमदपूर - चाकूर तालुक्यातील मोठ्या प्रमाणात सभासद, पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

# विलास सहकारी साखर कारखान्याची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा; २९ सप्टेंबर रोजी लातूर येथे

**लातूर/प्रतिनिधी :** सहकार आणि साखर उद्योगामध्ये पथदर्शी ठरलेल्या विलास सहकारी साखर कारखाना लि.,ची सन २०२४-२५ या वर्षाची अधिमंडळाची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, २९ सप्टेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. कारखान्याच्या चेअरमन श्रीमती वैशाली विलासराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा दुपारी १ वाजता संपन्न होईल.

विलास सहकारी साखर कारखाना ग्रामीण भागातील शेतकरी आणि कष्टकरी यांच्या आशा-आकांक्षांचे प्रतीक आहे. सध्या सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे सभेच्या स्थळात बदल करण्यात आला असून, ही सभा लातूर येथील हॉटेल वैष्णव, बँक्वेट हॉल, साई नाका, डीमार्ट रिंगरोड, लातूर येथे होणार आहे.

प्रमुख नेत्यांची उपस्थिती आणि विशेष प्रशिक्षण

या वार्षिक सर्वसाधारण सभेस कारखान्याचे मार्गदर्शक माजी मंत्री सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख, राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार कैलास घाडगे पाटील आणि जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणाऱ्या सभासद शेतकऱ्यांसाठी सकाळी १० ते १ वाजता सभेच्या स्थळी कृषिरत्न डॉ. संजीव माने यांचे ऊस लागवड तंत्रज्ञान व खोडवा व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, कीड व रोग व्यवस्थापन तसेच ऊसरोप लागवड यावर विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कारखान्याचे व्हाईस चेअरमन वैजनाथराव शिंदे, सर्व संचालक आणि कार्यकारी संचालक आबासाहेब पाटील यांनी अधिमंडळाची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभेस सर्व सभासदांना सभेसाठी वेळेवर उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

विलास कारखान्याच्या वार्षिक सभेचे स्थळ बदलले;

अतिवृष्टीमुळे हॉटेल वैष्णव येथे आयोजन

विलास सहकारी साखर कारखाना लि., वैशालीनगर, निवळी, ता. जि. लातूर यांच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची सन २०२४-२५ या वर्षाची 'अधिमंडळाची वार्षिक

सर्वसाधारण सभा' ही सध्या सुरू असलेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे नियोजित ठिकाणी होऊ शकत नाही. त्यामुळे सभेच्या स्थळामध्ये बदल करण्यात येत आहे. सभेची तारीख आणि

वेळ कायम राहील, मात्र स्थळामध्ये बदल झाला आहे. नवे स्थळ : हॉटेल वैष्णव, बँक्वेटस् हॉल, साई नाका, 'डी' मार्ट रोड, लातूर येथे होणार आहे.

## श्री स्वामी विवेकानंद विद्यालयातील खेळाडूंचे जिल्हास्तरीय शालेय ज्युदो क्रीडा स्पर्धेत यश



**लातूर/प्रतिनिधी :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने खेलो इंडिया कुस्ती प्रशिक्षण केंद्र बहुउद्देशिय इमारत जिल्हा क्रीडा संकुल, लातूर येथे २३ सप्टेंबर रोजी पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय ज्युदो क्रीडा स्पर्धेमध्ये श्री स्वामी विवेकानंद विद्यालय, लातूर व स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय, लातूर येथील खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले असून हे विद्यार्थी विभागिय क्रीडा स्पर्धे साठी पात्र ठरले आहेत. त्याबद्दल त्यांचा संस्थेच्यावतीने प्राचार्य मारुती सूर्यवंशी, प्राचार्य गोविंद शिंदे यांच्याहस्ते सत्कार करून पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

यामध्ये १४ वर्षाखालील मुलांच्या गटामध्ये प्रिन्स विलास सोनवणे याने अवघ्या ३० सेकंदात प्रतिस्पर्धकाला चितपट करत प्रथम क्रमांक पटकाविला. १७ वर्षाखालील मुलींच्या गटामध्ये राज्यस्तरीय स्पर्धेत पदक विजेते ठरलेली इशा दादासो कोल्हटकर हिने विजयाची परंपरा कायम राखली आहे. तर १९ वर्षाखालील मुलींच्या गटात सृष्टी गोविंद जाधव, श्रेया दत्ता कदम व रूबी चुन्नु शर्मा यांनीही विशेष कामगिरी केली आहे.

या खेळाडूंना क्रीडा विभाग प्रमुख मुकेश बिराजदार, क्रीडा शिक्षिका निलांबरी हिवाळे बिराजदार यांचे मार्गदर्शन लाभले. या खेळाडूंना मिळालेल्या यशाबद्दल उपमुख्याध्यापक प्रभाकर सावंत, गणेश कदम, बाळाराम पिचारे, अल्का अंकुशे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी खेळाडूंचे कौतुक केले.

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे आपत्ती व्यवस्थापनावर मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबिर संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** दि.२६ सप्टेंबर २०२५ रोजी दयानंद कला महाविद्यालय, लातूर,राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस) विभागाच्या व एन.आय.आय. टी फाउंडेशन दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्ती व्यवस्थापनावर आधारित विशेष मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबिर आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आपत्ती काळातील सजगता, तत्परता आणि सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणे हा होता.

शिबिराचे प्रमुख पाहुणे श्री.गौरव अग्रवाल ( एन.आय.आय. टी फाउंडेशन दिल्ली सिनियर रिजनल मॅनेजर) अग्निशमन दलाचे जवान श्री.बापूसाहेब जाधव,श्री.शारद माने. श्री.सुजित कल्याणकर श्री.अविनाश कराडे अग्निशमन दलाच्या जवानांकडून घेण्यात आलेले आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रत्यक्ष



प्रात्यक्षिक. यात आग लागल्यास कशी प्रतिक्रिया द्यावी, कोणत्या उपकरणांचा वापर करावा, आणि प्रथमोपचार कसे करावेत याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

विद्यार्थ्यांनीसुद्धा या प्रात्यक्षिकात सक्रिय सहभाग घेत प्रत्यक्ष कृतीद्वारे आग विझवण्याची प्रत्याक्षिक अनुभवली. या अनुभवातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष आपत्ती परिस्थितीत आवश्यक असलेल्या कौशल्यांचे प्रशिक्षण मिळाले.

कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजीराव गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ दिलीप नागरगोजे ,पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, डॉ.संतोष पाटील (आय.क्यू. सी.विभाग प्रमुख ), डॉ. रामेश्वर खंदारे सर, डॉ. शिवकुमार राऊत (एन.सी.सी. विभाग प्रमुख ), डॉ. संदीपान जगदाळे (राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय प्रमुख) ,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.सुभाष कदम प्रा अनिल भुरे प्रा. सिद्धार्थ भालेराव, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक निखिल पवार, साईकिशन सोनवणे,आयुष कांबळे व स्वयंसेविका निकिता कापसे, अनुषा पिटले,जान्हवी घोडके तसेच प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

# अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांच्यासह महावितरणला 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड'

## नवी दिल्लीमध्ये राष्ट्रीय शिखर परिषदेत सन्मान

**लातूर/प्रतिनिधी :** सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाच्या विद्युत क्षेत्रामध्ये विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला यांना वैयक्तिक गटात वर्ष २०२५ साठी 'वूमन इन एनर्जी अवॉर्ड'ने तर कंपनी गटात महावितरणला 'एनर्जी कंपनी (पॉवर) अवॉर्ड'ने नवी दिल्ली येथील राष्ट्रीय एनर्जी लिडरशिप शिखर परिषदेत गुरुवारी (दि. २५) गौरविण्यात आले.

मुख्यमंत्री व ऊर्जामंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि ऊर्जा राज्यमंत्री ना. मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी या सन्मानाबद्दल अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांचे तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र आणि सर्व अभियंता, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

केंद्रीय नवीन व नवीकरणीय राज्यमंत्री ना. श्रीपाद नाईक आणि सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. अनिल राजदान यांच्याहस्ते अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. इकॉनॉमिक टाइम्सच्या वतीने आयोजित दोन दिवसीय वार्षिक शिखर परिषद २०२५ मध्ये ऊर्जा, पेट्रोलियम व नैसर्गिक वायू, अक्षय ऊर्जा, खाण, पर्यावरण, वन आणि हवामान बदल आदी क्षेत्रातील सुमारे ५०० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींची उपस्थिती होती. या परिषदेत अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांचे महाराष्ट्रातील वीजक्षेत्राच्या सादरीकरणासह विशेष व्याख्यान झाले.

मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात ऊर्जा परिवर्तनातून सर्व वीजग्राहकांसाठी फायदेशीर आमुलाग्र सुधारणांना वेग दिला आहे. त्यामुळे वीज दरात प्रथमच घट झाली असून येत्या पाच वर्षांत ते आणखी कमी होत जाणार आहे. जगातील सर्वात मोठ्या १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्पांच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० द्वारे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. या योजनेमुळे महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. त्यामुळे प्रामुख्याने औद्योगिक व व्यावसायिक विजेचे दर स्वस्त होत जाणार आहेत. या योजनेत आतापर्यंत २४५८ मेगावॅट क्षमतेचे ४५४ प्रकल्प पूर्ण झाले असून ६ लाखांवरील शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध झाली आहे तर ३२ लाख एकर शेतजमीनीचे सौर ऊर्जेद्वारे सिंचन होत आहे.

यासोबतच सौर कृषिपंपाच्या विविध योजनेमधून राज्यात ६ लाख ४७ हजार सौर कृषिपंप कार्यान्वित करण्यात आले असून त्याद्वारे २१ लाख एकर जमीन ओलिताखाली आली आहे. सौर कृषिपंप बसविण्यामध्ये महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे.

मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी रिसोर्स अॅडेक्वेसी प्लॅन तयार केला आहे. या नियोजनात हरित ऊर्जेवर अधिक भर देण्यात आला आहे. सन २०३० पर्यंत विजेची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी तब्बल ३८ हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह ४५ हजार मेगावॅट विजेची आणखी भर पडणार आहे. राज्यातील नवीकरणीय ऊर्जेची क्षमता १३ टक्क्यांवरून ५२ टक्के होणार आहे. सोबतच सुमारे ३ लाख




३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून सुमारे ७ लाखांवर रोजगार निर्माण होणार आहेत. यासह पुढील पाच वर्षांत वीज खरेदीमध्ये ८२ हजार कोटी रुपयांची बचत होईल. त्यामुळे येत्या पाच वर्षांत सर्वच वर्गवारीतील वीज दर कमी होत जाणार आहे.

विद्युत क्षेत्रातील लोकाभिमुख विविध योजना व प्रभावी अंमलबजावणीमुळे प्रत्यक्षात झालेले विविध फायदे आदींच्या निकषांवर सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. अनिल राजदान यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यीय राष्ट्रीय निवड समितीने अपर मुख्य सचिव आभा शुक्ला व महावितरणची 'एनर्जी लिडरशिप अवॉर्ड २०२५'साठी निवड केली आहे.

# दररोज प्या या ड्रायफ्रुट्सचे पाणी, आरोग्य राहील निरोगी आणि त्वचा होईल चमकदार



मुंबई : सुका मेवा आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर असतो. त्यातीलच एक महत्त्वाचा सुका मेवा म्हणजे काळ्या मनुका. काळ्या मनुका नुसत्या खाण्याऐवजी जर तुम्ही त्या रात्रभर पाण्यात भिजवून सकाळी त्या पाण्याचे सेवन केले, तर त्याचे आरोग्याला अनेक फायदे मिळू शकतात.

काळ्या मनुकांमध्ये लोह (खीप), व्हिटॅमिन बी-कॉम्प्लेक्स (तळींराळप इ-लोश्रिशु), आणि अँटीऑक्सिडंट्स (-पींळेुळवरपींी) भरपूर प्रमाणात असतात. हे घटक शरी-राला अनेक प्रकारे मदत करतात. चला तर मग जाणून घेऊया काळ्या मनुकांचे पाणी पिण्याचे फायदे:

ॲनिमियापासून सुटका: काळ्या मनुकांमध्ये मोठ्या प्रमाणात लोह असल्याने शरी-रातील रक्ताची कमतरता (-पशाळर) भरून काढण्यासाठी हे पाणी खूप उपयुक्त ठरते. नियमित सेवन केल्याने शरीरात हिमोग्लोबिनची पातळी सुधारते.

बद्धकोष्ठतेपासून आराम: जर तुम्हाला बद्धकोष्ठतेची समस्या असेल, तर काळ्या मनुकांचे पाणी तुमच्यासाठी एक रामबाण उपाय आहे. यात असलेले फायबर (ऋळलशी) पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठतेपासून आराम मिळवण्यास मदत करते.

उच्च रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत: काळ्या मनुकांमध्ये पोटॅशियम (झेींरी-ीळीं) भरपूर असल्याने हे पाणी उच्च रक्तदाब (ब्ळसह इश्रेेव झीर्ीीीीश) नियंत्रित ठेवण्यास मदत करते. यामुळे हृदयरोगांचा धोका कमी होतो.केस आणि त्वचेसाठी फायदेशीर: काळ्या मनुकांमध्ये व्हिटॅमिन सी आणि अँटीऑक्सिडंट्स असल्याने ते केस गळणे थांबवते आणि त्वचा चमकदार बनवते.

रोगप्रतिकारशक्ती वाढवते: हे पाणी शरीरातील रोगप्रतिकारशक्ती (खार्ीपळीूं) वाढवते आणि तुम्हाला आजारांपासून दूर ठेवते.

कसे बनवायचे काळ्या मनुकांचे पाणी:

रात्री एका भांड्यात १०-१५ काळ्या मनुका घ्या.


त्या स्वच्छ पाण्याने धुवून घ्या.

त्यानंतर त्याच भांड्यात स्वच्छ पाणी घालून रात्रभर भिजत ठेवा.

सकाळी उठल्यावर त्या मनुकांचे पाणी गाळून रिकाम्या पोटी प्या.

काळ्या मनुकांचे पाणी हे फक्त चविष्टच नाही, तर आरोग्यासाठीही अत्यंत फायदेशीर आहे. नियमितपणे याचे सेवन केल्यास तुमच्या आरोग्यात नक्कीच सकारात्मक बदल दिसून येईल.

# भारतातील बगलामुखी देवीची ही मंदिरे तुम्ही पाहिली का?



नवरात्रोत्सव २०२५- नवरात्रीची तयारी रसगळीकडे सुरू झाली आहे. यानिमित्ताने विविध ठिकाणी देवीच्या दर्शनासाठी जाण्यास तुम्ही उत्सुक असाल. मग बगळामुखी देवीची ही मंदिरे तुम्ही नक्की भेट द्या. असे सांगतात की, येथे दर्शन घेतल्याने न्यायालयीन वादही सुटतात. देशातील अनेक प्रमुख व्यक्ती आणि राजकारणी देखील या मंदिरांमध्ये दर्शन घेण्यासाठी येतात. माता बगलादेवीची भारतातील ही तीन ऐतिहासिक मंदिरं खुप आकर्षक आहेत. त्याविषयी सविस्तर जाणून घेऊ. हिंदू पौराणिक कथांमध्ये, बगलामुखीला दहा महाविद्यांमध्ये आठवे स्थान आहे.

महाभारताच्या वेळेचे बगलामुखी मंदीर- मध्य प्रदेशातील शाजापूर जिल्ह्यातील नलखेडा येथे लखुंदर नदीच्या काठावर तीनमुखी माँ बगलामुखीचे मंदिर आहे. हे मंदिर महाभारत काळातील आहे असे सांगतात. महाभारत युद्धात विजय मिळवण्यासाठी पांडवांनी येथे ध्यान केले होते अशी आख्यायिका आहे. स्मृती इराणी, उमा भारती, गिरिराज प्रसाद, अमर सिंह, जयाप्रदा, विजयराजे सिंधिया यांच्यासह अनेक मोठ्या नेत्यांनी दरबारात दर्शन घेतले आहे.

पूर्वी देवीला देहरा या नावाने ओळखले जात असे. येथे हळद आणि पिवळ्या रंगाच्या पूजा साहित्याला पूजेत विशेष महत्त्व आहे.

दातिया जिल्ह्यातील माँ पितांबर सिद्धपीठ- हे मंदिर देवी पितांबरीला समर्पित आहे, जी तीन प्रहरात वेगवेगळी रूपे धारण करते. देवीची बदलती रूपे अज्ञात आहेत आणि मंदिरात प्राचीन वानखंडेश्वर महादेव शिवलिंग आहे.१९६२ च्या भारत-चीन युद्धादरम्यान, पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंच्या विनंतीवरून, मंदिराच्या पुजाऱ्याने देशाच्या संरक्षणासाठी ५१ कुंडांचा महायज्ञ केला.परिणामी, युद्धाच्या ११ व्या दिवशी, चीनने आपले सैन्य मागे घेतले.१९६५, १९७१ आणि २००० च्या भारत-पाकिस्तान युद्धांसह, राष्ट्रीय संकटाच्या काळात, मंदिर गुप्तपणे पूजा करण्याचे ठिकाण आहे, जिथे देवी पितांबराचा अवतार असलेली देवी बगलामुखी विजयासाठी पूजनीय होती.

न्यायालयीन खटल्यांमधूनही सुटका करणारी हिमाचलची कांगडा

येथे प्रार्थना केल्याने सर्व त्रास दूर होतात असे मानले जाते. त्यामुळे न्यायालयीन खटल्यांमधूनही सुटका मिळते. सामान्य लोकांपासून ते सेलिब्रिटी आणि राजकारण्यांपर्यंत सर्वजण मंदिरात येतात. मंदिराशेजारील प्राचीन शियावलीमध्ये एक शिवलिंग स्थापित आहे, जिथे लोक देवीचे दर्शन घेतल्यानंतर जलाभिषेक करतात. असे म्हटले जाते की देवी हळदीच्या पाण्यातून प्रकट झाली. पिवळ्या रंगामुळे तिला पितांबरी देवी असेही म्हणतात. तिला पिवळा रंग खूप आवडतो, म्हणून तिच्या पूजेमध्ये पिवळ्या रंगाचे साहित्य वापरले जाते


# ट्रम्प यांची आत्मस्तुती

विरोधकांना तुच्छ लेखणे, त्यांना 'डावे' ठरवणे, प्रत्येक गोष्टीचे श्रेय स्वत:कडे घेणे, देशाचा विकास आपणच करत असल्याची प्रौढी मिरवणे ही ट्रम्प यांची खासियत आहे. भारतातही वेगळे काही घडताना दिसत नाही.

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत (यूएन जनरल असेंब्ली) अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या भाषणाने कोणी चकित होण्याची शक्यता नव्हती. गेली काही वर्षे ते जे मुद्दे मांडत आहेत तेच त्यांनी पुन्हा मांडले. आपल्या देशातील विरोधक आणि परदेशी नेते किंवा विरोधक यांना तुच्छ लेखण्याची त्यांची वृत्ती पुन्हा एकदा दिसली. रशिया व युक्रेनमधील युद्ध अजूनही थांबलेले नसल्याने ट्रम्प यांनी पुन्हा एकदा रशियाला इशारा दिला. त्याचा काही परिणाम होणार नाही हे जगास ठाऊक आहे हा भाग वेगळा. या युद्धाच्या निमित्ताने भारत व चीनला टीकेचे लक्ष्य करण्याची संधीही त्यांनी परत एकदा साधली. रशियाकडून खनिज तेल विकत घेत या युद्धाला सर्वांत जास्त निधी हे दोन देश पुरवत आहेत हा आरोपही त्यांनी परत एकदा केला. दुसर्या महायुद्धानंतर 'नाटो' ही संघटना स्थापन करण्यात अमेरिकेचा पुढाकार होता; पण रशियाकडून खनिज तेल व नैसर्गिक वायू खरेदी करत असल्याबद्दल ट्रम्प यांनी नाटोच्या सदस्य देशांवर आणि युरोपीय देशांवरही टीका केली. आंतरराष्ट्रीय किंवा बहु देशीय सहकार्याच्या कल्पनेला ट्रम्प दुय्यम मानत असल्याचे त्यांच्या भाषणातून जाणवले. 'मेक अमेरिका ग्रेट अगेन' या त्यांच्या मोहिमेतील अनेक मुद्दे त्यांनी परत मांडले किंवा 'उगाळले'. स्थलांतरितांचा द्वेष त्यांच्या भाषणातून उघड झाला.

पर्यावरणाला धोकाच नाही?

ट्रम्प जवळपास एक तास बोलले. त्यांना नेमून दिलेल्या वेळेपेक्षा चौपट वेळ त्यांनी घेतला. 'संयुक्त राष्ट्रे' या आंतरराष्ट्रीय संस्थेला अथवा संघटनेला ट्रम्प कस्पटासमान मानतात हे त्यांच्या पहिल्या कारकीर्दीतच त्यांनी दाखवून दिले होते. त्याच संघटनेच्या व्यासपीठावरून बोलताना त्यांनी त्या संघटनेवरही टीकास्त्र सोडले. भारत-पाकिस्तान यांच्यातील संघर्ष आपण थांबवला हा दावा त्यांनी पुन्हा एकदा केला. अध्यक्षपदाची सूत्रे



स्वीकारल्यापासून आपण सात संघर्ष थांबवले हे त्यांनी ठासून सांगितले. गेल्या आठवड्यात त्यांनी हा दावा करताना आपल्याला शांततेचे 'नोबेल' मिळाले पाहिजे ही मागणीही परत एकदा केली होती. त्यांनी कोणते संघर्ष किंवा युद्धे थांबवली याचे तपशील 'व्हाइट हाऊस'च्या प्रसिद्धी विभागाने जगासमोर मांडले पाहिजेत. संघर्षग्रस्त देशांच्या सर्व नेत्यांशी आपण व्यक्तिश: बोललो; मात्र त्यात संयुक्त राष्ट्रांनी किंवा तिच्या सुरक्षा मंडळाने आपल्याला काही मदत केली नाही, अशी तक्रारवजा टीका त्यांनी जगासमोर केली. इस्रायल गाझापट्टीत निष्पाप पॅलेस्टिनी नागरिकांचे हत्याकांड करत आहे, त्याबद्दल ट्रम्प चकार शब्दही बोलले नाहीत. पॅलेस्टाईनच्या बाजूने बोलणे म्हणजे 'ज्यू विरोधी' भूमिका मांडणे (अँटी सेमिटिझम) असे त्यांना वाटते आणि तो समज ते अमेरिकेत दृढ करू पाहात आहेत. पॅलेस्टाईनला पाठिंबा दाखवणार्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवरच ट्रम्प यांनी हार्वर्ड विद्यापीठाचा निधी रोखला. पॅलेस्टिनींबद्दल कणव दाखवणे म्हणजे मुस्लिमांना पाठिंबा देणे हा समज अमेरिकेप्रमाणेच भारतातही वाढवला जात आहे. 'उजव्या' गटांना पॅलेस्टिनी नागरिकांची उपासमार, हत्या हे गैर वाटत नाही. स्थलांतरितांमुळे युरोपीय देश कोसळतील असा 'इशारा' देताना ट्रम्प यांनी स्थलांतरितांचा उल्लेख 'एलियन' (परग्रहवासी) या शब्दात केला. भारतातही हल्ली सत्ताधारी 'घुसपेठिये' हा शब्द वापरत आहेत आणि त्यांच्यामुळे ईशान्य राज्यातील लोकसंख्येची रचना बदलत असल्याची भीती दाखवत आहेत, हे लक्षणीय आहे. 'हवामान बदल ही कल्पना म्हणजे मोठी फसवणूक आहे' असे म्हणण्याचे धाडस ट्रम्प यांच्यासारखी अति अहंकारी व्यक्तीच करू शकते. पर्यावरण रक्षणाबाबतचा 'पॅरिस करार' त्यांनी कधीच झिडकारला आहे. पूर्वीसारखी अमेरिका एकमेव महासत्ता राहिलेली नाही. ट्रम्प यांच्या निर्बंधांना रशिया भीक घालत नाही. चीनशी करार करणे अमेरिकेला भाग पडले आहे. तरीही आफ्रिका व आशियातील अनेक देशांना, त्यात भारतही आहे, अमेरिकेच्या आधाराची गरज वाटत आहे ही चिंतेची बाब आहे. या देशांनी परस्परात व्यापार वाढवणे हाच मार्ग आहे. कारण स्वत:वर खूष असणार्या ट्रम्प यांची हुकूमशाही आणखी चार वर्षे चालणार आहे.

## पौष्टिक खा, फिट राहा! डॉक्टर टीप्स

नव्या वर्षात तुम्ही फिटनेसच्या दृष्टीनं काही संकल्प करत असाल तर त्याची सुरुवात आतापासून करणं गरजेचं आहे. सध्याचा काळात अत्याधुनिक जिम आणि उत्तम व अनुभवी व्यायाम प्रशिक्षक या सर्वांमुळे कठीण वाटणारा व्यायाम आता सोपा वाटू लागला आहे. तसंच काळाची गरज जाणून अनेकांती पावलं जिमच्या दिशेनं वळू लागली आहेत. तुमच्या संकल्पाच्या दृष्टीनं फायदेशीर ठरतील अशा व्यायामाच्या प्रकारांविषयी आजच्या लेखातून जाणून घेऊ या...



स्पिनिंग

या व्यायाम प्रकारात सायकल चालवण्यास प्राधान्य दिलं जातं. हे हृदय आणि फुफ्फुसासाठी फायदेशीर असतं. तुमच्या पायांच्या स्नायूंना देखील बळकटी मिळते. सायकलींमध्ये येणाऱ्या नवनव्या तंत्रज्ञानामुळे लोकांची सायकल चालवण्यात रुची वाढली आहे. सोबतच व्यायाम करण्यासाठी इतर पर्यायांसोबतच सायकलचा वापर देखील वाढत चालला आहे.(**क्रमशः**)

## विनोद




राधा : काय गं राणी, तुझ्या नवऱ्याला तुरुंगात का जावे लागले?

राणी : काय नाही गं, यांनी नोटा छापायची सरकारशी स्पर्धा केली म्हणून.

## संदेश

Tourist = Ye kiska kankaal hai..?

Santa = Ye tipu-sultaan ka kankaal hai..

Tourist = Or ye bagal wala chhota sa kankaal kiska hai..?

Santa = Ye bhi tipu-sultaan ka kankaal hai.. jab wo chhota bachcha tha....

## सुविचार




शब्दांपेक्षा मौनच जास्त बोलके असते.
- कार्लाइल

**संस्कृत सुभाषित**

आयु: सत्त्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धना:।
रस्या: ास्निग्धा: ास्थिरा हृद्या आहारा: सात्विकप्रिया : ।।

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार सात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

## उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

## आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

## उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रसवान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा ७६.यातना ७७.भार ७८.वामा ७९.हर ८०.अंत

# नदीच्या पुराने वेढलेल्या आरजखेडा येथील नागरिकांना ऋषिकेश कराड यांचा दिलासा

**लातूर/प्रतिनिधी :** गेल्या काही दिवसापासून सततच्या पावसाने शेतातील उभ्या पिकाचे प्रचंड नुकसान झाले आणि गावालगत असलेल्या मांजरा नदीच्या पूर परिस्थितीमुळे रेणापूर तालुक्यातील मौजे आरजखेडा हे गाव मोठ्या संकटात सापडले. गावच्या तिन्ही बाजूंनी गावात पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले. या नुकसानीची पाहणी करून भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी या नुकसानग्रस्त शेतकऱ्यासह ग्रामस्थांशी संवाद साधला. राज्यातील महायुती शासन आणि आपले आमदार महोदय रमेशआप्पा आपल्या पाठीशी आहेत असा दिलासा दिला.

रेणापूर तालुक्यातील मौजे आरजखेडा या गावात जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले आहे. गेल्या काही दिवसापासून होत असलेल्या सततच्या पावसामुळे आणि गावालगत असलेल्या मांजरा नदीच्या पात्रात धरणातील सतत पाणी सोडल्याने नदीला मोठा पूर आला या पुराचे पाणी गावाच्या तिन्ही बाजूने गावात शिरले. अनेक घरांमध्ये पाणी जाऊन मोठे नुकसान झाले. पुरामुळे मांजरा नदीवरील पूल पाण्याखाली गेल्याने लातूरला जाणारा आणि रेणापूरकडे जाणारा रस्ता बंद झाल्याने गावचा संपर्क तुटला शिवाय गाव पूर्णपणे पाण्याने वेढले गेले त्यातच वीज पुरवठा खंडित झाला होता.

अत्यंत संकटात सापडलेल्या या गावाला भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी बुधवारी भेट देऊन ज्या घरात पाणी शिरले होते त्या घराची व इतर नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासमवेत भाजपाचे दशरथ सरवदे, श्रीकृष्ण पवार, दिलीप पाटील, लक्ष्मण खलंग्रे, राम बरीदे, सरपंच कुलदीप सूर्यवंशी, उपसरपंच भालचंद्र सूर्यवंशी यांच्यासह इतर अनेक जण होते.

युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी गावातील लोकांशी संवाद साधून विचारपूस केली अडीअडचणीची चौकशी केली. लाईट बंद असल्यामुळे पिण्याच्या पाण्याची मोठी अडचण झाल्याने तेथे संबंधितांना तातडीने टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची सूचना करून पाण्याची सोय केली. शेतात अडकलेल्या लोकांची चौकशी केली या एकूण परिस्थिती बाबत अरजखेडा गावातून तहसीलदार थोरात यांना फोनद्वारे व्हिडिओ कॉल करून परिस्थिती दाखवून संपूर्ण माहिती दिली.

खरिपाची सर्व पिके हातातून गेली नैसर्गिक नुकसान कसेही भरून काढता येईल मात्र एखादी जीवित हानी झाली तर कशानेही भरून निघणार नाही तेव्हा नागरिकांनी सतर्क राहून कोणीही पुराच्या पाण्यात जाऊ नये सकल भागातील रहिवाशांनी सावधानता बाळगावी आपला जीव आणि पशुधन सुरक्षित कसे राहील यासाठी प्रत्येकाने काळजी घ्यावी असे आवाहन करून राज्यातील महायुती शासन आपल्या पाठीशी आहे आपल्या मतदारसंघाचे आमदार रमेशआप्पा कराड साहेब आपल्या संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत सर्व



नुकसान ग्रस्तांना शासनाकडून भरीव मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत असे ऋषिकेशदादा कराड यांनी बोलून दाखवले.

यावेळी अरजखेडा येथील राजेभाऊ सूर्यवंशी, रामचंद्र नामदेव सूर्यवंशी, गोपाळ रावसाहेब सूर्यवंशी, बजरंग भाऊसाहेब सूर्यवंशी, खंडू जोगदंड, नवनाथ जोगदंड, हरिश्चंद्र सूर्यवंशी, बालासाहेब सूर्यवंशी, वजीर पठाण, नजीर पठाण, बाळासाहेब भालचंद्र सूर्यवंशी, नवनाथ सूर्यवंशी, ज्ञानेश्वर सूर्यवंशी, सुनील सूर्यवंशी, नाथराव सूर्यवंशी, सचिन सूर्यवंशी, आत्माराम सूर्यवंशी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने होते.

## संजय निलेगांवकर यांची मध्य रेल्वे विभागीय सल्लागार समिती सदस्यपदी नियुक्ती



**लातूर/प्रतिनिधी :**लातूर येथील यशस्वी युवा उद्योजक संजय निलेगांवकर यांची मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागीय सल्लागार समिती सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

संजय निलेगांवकर यांच्यावर यापूर्वी मध्य रेल्वेच्या लातूर स्थानिक सल्लागार समिती सदस्यपदाची जबाबदारी होती. त्यावेळी त्यांनी रेल्वे प्रवाशांच्या समस्या सोडविण्याकामी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्याचप्रमाणे माल वाहतुकीसंदर्भातील समस्या मांडून त्या समस्यांची सोडवणूक यशस्वीपणे करण्याचे काम केले आहे. रेल्वेशी संबंधित समस्या आणि प्रश्नांचा त्यांना चांगला अभ्यास आहे. लातूर लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी निलेगांवकर यांची मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाचे मुख्य महाव्यवस्थापकांकडे शिफारस केली होती. त्यांच्या शिफारसीनुसार वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील यांनी निलेगांवकर यांना नियुक्ती पत्र प्रदान केले आहे.

संजय निलेगांवकर यांच्या या नियुक्तीचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, सहकार महर्षी तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आ. अमित विलासराव देशमुख, माजी आमदार तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धीरज विलासराव देशमुख, अभय साळुंके, अॅड. किरण जाधव, दीपक कोटलवार, उदय चौंडे, उदय पाटील, जगदीश कुलकर्णी, अॅड. संजय पांडे, अशोक गोविंदपूरकर, शिवकुमार क्षीरसागर, प्रसाद उदगीरकर, शिवाप्पा कोरके, हरिराम कुलकर्णी, दगडूआप्पा मिटकरी, लक्ष्मण कांबळे, बाळासाहेब देशपांडे, डॉ. श्रीनिवास संदीकर यांसह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

## ओझोन दिनानिमित्त लातूरमध्ये पर्यावरण जनजागृती उपक्रम; शाहू महाविद्यालयात पोस्टर सादरीकरण, रांगोळी स्पर्धा व इको क्लबचे उद्घाटन



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांच्या संकल्पनेतून व शाहू महाविद्यालय, लातूर यांच्या सहकार्याने ओझोन दिनाचे औचित्य साधून पर्यावरण जनजागृतीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांत विद्यार्थ्यांनी प्रेरणादायी पोस्टर सादरीकरण, रंगीबेरंगी रांगोळी स्पर्धा केली तसेच महाविद्यालयातील नव्याने स्थापन झालेल्या ग्रीन इको क्लब चे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी ऊर्जा बचत, ओझोन थर संवर्धन आणि हरित भविष्य या विषयांवर प्रभावी मांडणी केली.

या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, पर्यावरण संवर्धन अधिकारी सन्मती मेस्त्री, ग्रीन क्लब समन्वयक डॉ. किशोर शिंदे, CPCB सल्लागार प्रताप गर्जे, NCAP सल्लागार श्रीमती गीतांजली कोशिक तसेच ग्रीन क्लब विद्यार्थी अध्यक्ष रत्नदिप भुरे उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेचे कौतुक केले व अशा उपक्रमांमुळे युवकांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव जागृत होऊन हरित भविष्य घडविण्यासाठी प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन केले.

## विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व परीक्षा शुल्क सरसकट माफ करावे : अभाविपची मागणी




**धाराशीव/प्रतिनिधी :** राज्यात यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक जिल्ह्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेतकरी, विद्यार्थी व सामान्य नागरिकांचे प्रचंड नुकसान झाले असून अनेक गावांमध्ये पाणी शिरल्याने घरे, शाळा, महाविद्यालये तसेच जीवनावश्यक वस्तूंचा नाश झाला आहे. या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) तर्फे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे. हे निवेदन धाराशिव जिल्हाधिकारीमार्फतही देण्यात आले.

अभाविपने मांडलेल्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहेत पूरग्रस्त शाळा-महाविद्यालयांचे नुकसान भरून काढून विद्यार्थ्यांना गणवेश व पुस्तके विनामूल्य उपलब्ध करून द्यावीत. अतिवृष्टीग्रस्त क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व परीक्षा शुल्क संपूर्ण माफ करण्यात यावे. परीक्षेला बसू न शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी फेर परीक्षा घेण्यात याव्यात. पूरग्रस्त भागांतील स्पर्धा परीक्षा फॉर्म शुल्क माफ करून सरसकट फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी. ''कमवा व शिका'' योजनेचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावा तसेच नष्ट झालेली शैक्षणिक कागदपत्रे विनाशुल्क पुन्हा देण्यात यावीत.

याशिवाय नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून योग्य ती आर्थिक मदत द्यावी, पूरग्रस्त भागांमध्ये आरोग्य सुविधा, स्वच्छता मोहीम व औषधोपचार त्वरीत उपलब्ध करून द्यावेत तसेच अन्न पुरवठ्याची गरज असलेल्या ठिकाणी तात्काळ अन्न उपलब्ध करून द्यावा, अशा मागण्या देखील करण्यात आल्या आहेत.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये व पुरग्रस्त कुटुंबांना योग्य मदत मिळावी यासाठी शासनाने या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने दिलासा देणारा निर्णय घ्यावा, अशी मागणी अभाविप शहर मंत्री कु. साक्षी पाटील यांनी केली.

## रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने मुसळेवाडी जि. प. शाळेला संगणक भेट




**लातूर/प्रतिनिधी :** रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलच्या वतीने डिस्ट्रिक्ट ग्रँट फंडातून मुसलेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला डिजिटल क्लासरूम अंतर्गत संगणक भेट देण्यात आला.

याप्रसंगी रोटरी क्लब ऑफ लातूर सेंट्रलचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे, सचिव डॉ. नेताजी शिंगटे, सदस्य गिरीश ब्याळे, चंद्रकांत गुंडरे, विनोद पंडगे उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक हंसराज मुदामे यांनी रोटरीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. रोटरी क्लबच्या वतीने देण्यात आलेल्या संगणकाच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांना अद्यावत शिक्षणाचे धडे देणे सोपे झाल्याची भावना मुख्याध्यापकांनी यावेळी व्यक्त केली.

क्लबचे अध्यक्ष बाळासाहेब खैरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना रोटरी परिवार सामाजिक कार्यात सातत्याने अग्रेसर असल्याचे सांगितले. जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनाही संगणकाचे अद्यावत ज्ञान मिळणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन सादर संगणक भेट देण्यात आल्याचे सांगून विद्यार्थ्यांनी या संगणकाच्या सहाय्याने स्वतःला जगाच्या स्पर्धेत उतरविण्यासाठी सक्षम करावे, असे आवाहन केले.

## १२९ विद्यार्थ्यांना मिळाली नौकरी!; दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलचा पुढाकार

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद वाणिज्य महाविद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबवत असते. याच परंपरेत महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेल व करिअर गाईडन्स विभागा तर्फे दिनांक २० सप्टेंबर २०२५ रोजी एकदिवसीय मेगा कॅम्पस ड्राईव्ह भव्यदिव्य पद्धतीने आयोजित करण्यात आला.

या कॅम्पस ड्राईव्हमध्ये महाविद्यालयातील ४५० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सखोल मुलाखत व भरती प्रक्रियेनंतर त्यापैकी तब्बल १२९ विद्यार्थ्यांची निवड विविध नामांकित कंपन्यांमध्ये झाली. या विद्यार्थ्यांना रोजगार मिळाल्याने महाविद्यालयासोबतच पालक व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

प्रतिष्ठित कंपन्यांचा सहभाग

या मेगा कॅम्पस ड्राईव्हमध्ये ई.ओ.एस. ग्लोबल प्रायव्हेट लिमिटेड, रुपी एक्सपर्ट प्रायव्हेट लिमिटेड आणि ब्रिटानिया इंडस्ट्रीज लिमिटेड या नामांकित कंपन्यांनी सहभाग घेत विद्यार्थ्यांची भरती प्रक्रिया राबवली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना ऑफर लेटर्सचे वितरण महाविद्यालयातच करण्यात आले.

महाविद्यालय प्रशासनाचे मार्गदर्शन

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. बी.टी. चव्हाण, बीसीए विभाग प्रमुख



प्रा. शशिकांत स्वामी, बीबीए विभाग प्रमुख डॉ. वैशाली सातपुते, प्लेसमेंट ऑफिसर प्रा. दगडू शेख यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच प्लेसमेंट कमिटीचे सदस्य डॉ. कल्याणी औसेकर, प्रा. सुहाना शेख, प्रा. शैलजा चिकटे, प्रा. गीतांजली जोशी, प्रा. प्रसाद पाटील व प्रा. ज्योती महावरकर यांनी या उपक्रमात महत्वाची भूमिका बजावली. याबरोबरच कॉमर्स असोसिएशनचे सदस्य तसेच बीसीए व बीबीए विभागातील विद्यार्थ्यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पाऊल

या मेगा कॅम्पस ड्राईव्हच्या यशस्वी आयोजनामुळे विद्यार्थ्यांना करिअरच्या संधी उपलब्ध झाल्या असून, त्यांच्या आत्मविश्र्वासात भर पडली आहे. रोजगार मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या भविष्यास नवी दिशा मिळाली असून, महाविद्यालयाच्या विद्यार्थी प्रगती - समाज प्रगती या ध्येयधोरणाचीही यशस्वी अंमलबजावणी झाली आहे.

## जागतीक फार्मासिस्ट दिनानिमित्त चन्नाबसवेश्वर फार्मसी कॉलेज लातूरमध्ये प्लेसमेंट ड्राइव्ह यशस्वी

**लातूर/प्रतिनिधी :**''जागतीक फार्मासिस्ट दिनानिमित्त चन्नाबसवेश्वर फार्मसी कॉलेज डिग्री, लातूर आणि लॅमियम फार्मास्युटिकल प्रा. लि., पुणे यांच्या सहकार्याने दि २४/०९/२०२५ रोजी कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात आला. महाविद्यालयांतील एकूण ४० उमेदवारांनी प्लेसमेंट प्रक्रियेत भाग घेतला, त्यापैकी १२ उमेदवारांची निवड करण्यात आली.

प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन ट्रेनिंग आणि प्लेसमेंट ऑफिसर श्री. अमोल डी. नारागुडे आणि समन्वयक श्री. मोईन एस. अत्तार यांनी डॉ. विजयेंद्र स्वामी एस. एम., प्राचार्य, चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज डिग्री, लातूर यांच्या मार्गदर्शनाखाली केले. या कार्यक्रमाला पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्ट, आलूरचे सचिव माननीय भीमाशंकर देवणिकर यांचे समर्थन लाभले.



कॅम्पस ड्राइव्हची सुरुवात लॅमियम फार्मास्युटिकल प्रा. लि., पुणे चे संचालक श्री. विजयकुमार मंगरुळे यांचा सन्माननीय प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी एस. एम. सर यांच्या हस्ते महाविद्यालयाचे सन्मानचिन्ह शालने सत्कार करून करण्यात आली. सर्व शिक्षक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे प्लेसमेंट ड्राइव्ह यशस्वी झाला.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.

शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## अधिसूचना

### भूसंपादन अधिनियम-२०१३ (२०१३ चा ३०) मधील कलम ११ (१) अन्वये

जा. क्र. 2023/भूसंपादन/सिआर -2

उपविभागीय अधिकारी कार्यालय, उमरगा

दिनांकः- 14.08.2025

**भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013.**

ज्याअर्थी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 (2013 चा 30) याच्या कलम 3 च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग शासन अधिसुचना क्र. MIS-11/2014/CR-77(PART-2)/A-2DATED-11/09/2015 (यात यापुढे जिचा निर्देश उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 3 खंड (झेडअे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील 10,000 हेक्टर अधिकन सेल इतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचने नुसार समुचित शासन असलेल्या धाराशिव जिल्हाच्या जिल्हाधिकाऱ्यास या सोबत जोडलेल्या अनुसूची मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमिनीच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त जमिन असा करण्यात आला आहे) संपादनाची कार्यवाही ही सार्वजनिक प्रयोजनासाठी (या पुढे ज्याचा निर्देश उक्त सार्वजनिक प्रयोजन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते ज्याच्या स्वरुपाचे विवरण या सोबत जोडलेल्या अनुसूची दोन मध्ये दिलेले आहे, आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोटकलम (01) च्या तरतुदींन्वये याद्वारे असे सूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

ज्याअर्थी, प्रस्तावित भूमिसंपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, या सोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत. (सदर प्रकल्पात कोणत्याही व्यक्तीचे विस्थापन होणार नाही).

ज्याअर्थी, कलम 43 च्या पोटकलम (01) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील या सोबत जोडलेल्या अनुसूची पाच मध्ये दिलेला आहे. (सदर प्रकल्पात पुनर्वरान व पुनर्वसाहत करण्याची आवश्यकता नाही.)

त्याअर्थी, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोटकलम 4 अ नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिंनाकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल क जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही,

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर, जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल, परतु, आणखी असेकी, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दी पुरस्तर उल्लंघन केल्यास त्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम 11 च्या पोटकलम (05) नुसार जिल्हाधिकारी भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क नियम महाराष्ट्र 2014 (यात यापुढे ज्यांचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम 10 च्या उपनियम (03) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमि अभिलेखांच्या अद्यावती करणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअथी, उक्त अधियनियमाच्या कलम 3 च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी, उक्त अधिनिमाखालील जिल्हाधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, उमरगा, जिल्हा धाराशिव यास पद निर्देशित करीत आहे.

**दत्तु शेवाळे**
**उपविभागीय अधिकारी तथा**
**भूसंपादन अधिकारी उमरगा**

### अनुसूची एक

**रामनगर साठवण साठव तलाव मौ. अचलेर/बेळंब बुडीत क्षेत्रासाठी अतिरिक्त भूसंपादन**

| अ.क्र | गावाचे नाव | भूमान किंवा स.न./गट क्रमांक | संपादीत करावयाचे संयुक्त मोजणी प्रमाणे क्षेत्र हे आर |
|---|---|---|---|
| १ | अचलेर | ६८६ | ०.४६ |
| २ | अचलेर | ६८६ | ०.५५ |
| ३ | अचलेर | ६८९ | ०.२६ |
| ४ | अचलेर | ६९१ | १.०० |
| ५ | अचलेर | ६९२ | ०.७० |
| ६ | अचलेर | ६९२ | ०.७० |
| ७ | अचलेर | ६९४ | ०.१९ |
| ८ | अचलेर | ६९४ | ०.४६ |
| ९ | अचलेर | ६९४ | ०.६५ |
| १० | अचलेर | ६९५ | ०.६० |
| ११ | अचलेर | ६९५ | ०.६० |
| १२ | अचलेर | ६९७ | १.०० |
| १३ | अचलेर | ६९७ | ०.२८ |
| १४ | अचलेर | ६९९ | १.४० |
| १५ | अचलेर | ७०० | ०.१५ |
| १६ | अचलेर | ७०० | ०.१५ |
| १७ | अचलेर | ७०१ | ०.६० |
| १८ | अचलेर | ७०२ | ०.३५ |
| १९ | अचलेर | ७०३ | ०.३६ |
| २० | अचलेर | ७०६ | ०.७० |
| २१ | अचलेर | ७०७ | ०.६० |
| | एकूण | | ११.७६ |
| २२ | बेळंब | ३८३ | १.५१ |
| २३ | बेळंब | ३७७ | ०.२९ |
| | एकूण | | १.८० |
| | एकूण=अचलेर+बेळंब | | १३.५६ |

**दत्तु शेवाळे**
**उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी उमरगा**

### अनुसूची दोन

**सार्वजनिक प्रयोजन स्वरुपात विवरण.**

**प्रकल्पाचे नावः रामनगर साठवण तलाव ता. उमरगा जि. धाराशिव बुडीत क्षेत्रासाठी अतिरिक्त क्षेत्राचा भुसंपादन**

**प्रकल्पाचे वर्णनः- रामनगर साठवण तलाव ता. उमरगा जि.धाराशिव बुडीत क्षेत्रासाठी अतिरिक्त क्षेत्राचा भुसंपादन ता. उमरगा/लोहारा जि. धाराशिव**

**समाजाला मिळणारे लाभ :- रामनगर साठवण तलावामुळे मौ. अचलेर/बेळंब या गावास प्रत्यक्ष सिंचनाचा लाभ होणार आहे**

### अनुसूची तीन

**बाधीत व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे,**

सदरच्या भूसंपादन प्रक्रीयेमुळे सदरील गावातील कोणतीही व्यक्ती/कुटुंब सद्यस्थितीमध्ये विस्थापीत होत नाहीत.

### अनुसूची चार

**(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला सामाजिक प्रभाव निर्धारण सारांश)**

**साठवण तलावसाठीः** संपादीत होत असल्याने सदरच्या प्रकरणी सामाजिक आघात निर्धारण अभ्यास करण्याची आवश्यकता वाटत नाही.

### अनुसूची पाच

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**अ-** प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम- लागू नाही.

**ब -** प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता लागू नाही.

**घ-**ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसुचनेचा तपशील लागू नाही.

**टिप :-** 1) सदर प्रकल्पासाठी होणाऱ्या भूसंपादनामुळे कुठल्याही व्यक्तीचे पुनर्वसन करण्याची आवश्कता नाही. त्यामुळे अधिनियम 43 अन्वये प्रशासकाची नियुक्ती केलेली नाही.

2) उक्त जमिनीच्या आराखड्याचे उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, उमरगा यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

सदर अधिसूचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किं-वा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याचे कलम 11 चे उप कलम 01 खाली अधिसूचित करण्यात आले आहे. प्रांरभिक अधिसूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून (60) दिवसाच्या आत **उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, उमरगा** यांचे कार्यालयात आक्षेप नोदविता येईल.

**दिनांकः १४.०८.२०२५**
**ठिकाणः उमरगा**

**दत्तु शेवाळे**
**उपविभागीय अधिकारी तथा**
**भुसंपादन अधिकारी उमरगा**

जिमाका/एके/जाहि. /६८/२०२५-२६

## श्री तुळजाभवानी देवींची ललिता पंचमीनिमित्त रथ अलंकार महापूजा

तुळजापूर (माध्यम कक्ष): महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी देवीजींच्या शारदीय नवरात्र महोत्सवास २२ सप्टेंबरपासून सुरुवात झाली.आज पाचव्या माळेच्या दिवशी ललिता पंचमीनिमित्त रथ अलंकार महापूजा संपन्न झाली.यावेळी भाविकांनी मोठ्या उत्साहाने उपस्थित राहून देवीजींचे दर्शन घेतले.

धार्मिक आख्यायिकेनुसार भगवान सुर्यनारायण यांनी त्रिलोक भ्रमणासाठी आपला रथ श्री तुळजाभवानी मातेस दिला होता.त्या परंपरेतून आजही रथ अलंकार अवतार पूजेला विशेष महत्व आहे.

दरम्यान,गुरुवार, २५ सप्टेंबर रोजी चौथ्या माळेच्या दिवशी मोर वाहनावरून श्री तुळजाभवानी देवींजींची पारंपरिक छबिना मिरवणूक काढण्यात आली.या मिरवणुकीत भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

शारदीय नवरात्र उत्सवाच्या उर्वरित दिवसांत दररोज वेगवेगळ्या वाहनांवरून देवीची छबिना मिरवणूक काढण्यात येणार असून भाविकांना या सोहळ्याचे दर्शन घेता येणार आहे. मंदिर संस्थानच्या वतीने भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे.

## पूरग्रस्त कुटुंबांना मनिषा केंद्रे यांच्या वतीने किराणा साहित्य भेट



धाराशिव/रामेश्वर डोंगरे :- धाराशिव जिल्ह्यात यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असून अनेक घरांमध्ये पाणी शिरले असून कुटुंबाचा संसार उघड्यावर आलेला आहे. अभूतपूर्व अशा प्रकारचे नुकसान झालेले आहे. यातून सावरण्यासाठी विशेष मदतीची गरज आहे. या संकटात भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा चिटणीस सौ. मनिषाताई नवनाथ केंद्रे यांनी भंडारवाडी व परिसरातील पूरग्रस्त कुटुंबांना भेट देऊन नुकसानाची पाहणी केली. तसेच तात्पुरती मदत म्हणून किराणा साहित्याचे वाटप केले. किराणा साहित्याचे वाटप करत असताना अनेक महिलांना अश्रू अनावर झाले.

भंडारवाडी व परिसरातील गावांमध्ये अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने घरातील संस्कार उपयोगी वस्तू आणि अन्नधान्य पूर्णपणे खराब झालं यामुळे अनेक कुटुंबाचा संसार उघड्यावर आला आहे. त्यांच्यासमोर अन्न आणि निवाऱ्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या परिस्थितीत पूरग्रस्त कुटुंबांना केंद्रे यांनी सामाजिक सलोखा जपत आधार दिला.

पावसामुळे घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसानीबद्दल बोलताना केंद्रे यांनी ही वेळ धीर सोडण्याची नाही, तर एकजुटीने या संकटाचा सामना करण्याची आहे. आपण सगळे मिळून या परिस्थितीतून बाहेर पडू. जिल्ह्याचे नेते आमदार राणाजगजितसिंह पाटील व उपाध्यक्षा अर्चनाताई पाटील जिल्हाध्यक्ष दत्ता भाऊ कुलकर्णी व महायुती सरकार आपल्या पाठीशी आहे असे मत व्यक्त केले. या प्रसंगी शालिनी वडगणे, एडके ताई भंडारवाडी गावचे सरपंच सागर एडके, तुगांव येथील भाजपा तालुका चिटणीस सचिन लोमटे, आत्माराम बंडगर, बालाजी लवटे, दत्ता बनसोडे, श्रीराम एडके, संतोष साबळे, व गावातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**
**निविदा सूचना क्रमांक SUR-N-T-2025-26-17**
**तारीखः २४.०९.२०२५**

डीआरएम (एस अँड टी) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर आणि मा.भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा आमंत्रित केल्या आहेत. खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांना माहिती द्यावी: **परिसरासह कामाचे नावः** सोलापूर विभागातील कुर्डूवाडी-भिगवण विभागातील एस अँड टी गीअर्सच्या देखरेखीसाठी रिमोट डायग्रोस्टिक अँड प्रेडिक्टिव्ह मेंटेनन्स (RDPM) सिस्टमची तरतूद. **निविदा क्रमांक.** -SUR-N-T-2025-26-17, **कामाची अंदाजे किंमत** रु.५,५७,६९,८३०.६२/-, **निविदे फॉर्मची किंमत-नाही**, **जमा करावयाची बयाणा रक्कम** - रु.४,२८,९००/-, **काम पूर्ण करण्याचा कालावधी** - १२ महिने. **निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळः** १६.१०.२०२५. तपशील IREPS वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धीपत्रक/दुरुस्ती असल्यास ती फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केली जाईल. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मेल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग खखख डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. अर्नेस्ट मनी (EMD) पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजे बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या वितरित करावी. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

SUN 82 विभागीय रेल्वे व्यवस्थापक एस आणि टी शाखा

टिकट के लिए UTS APP डाउनलोड करें

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649